# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल:pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ क्र. :साफुपुवि/निववि/ ७१६ दिनांक : १८/११/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
मा. विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग

विषय :— विद्यापीठ वर्धापनदिन पुरस्कार सन २०१९—२०

महोदय/महोदया,

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता विद्यापीठ वर्धापनदिनी देण्यात येणा—या उत्कृष्ट विद्यापीठ शैक्षणिक विभाग, उत्कृष्ट महाविद्यालये/परिसंस्था, उत्कृष्ट प्राचार्य/संचालक पुरस्कार (महाविद्यालये/परिसंस्था), उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालये/ परिसंस्था), नाविन्यपूर्ण शैक्षणिक कामगिरी पुरस्कार (महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ विभाग), तसेच राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सन्मान (Felicitation) (महाविद्यालये/ परिसंस्था व विद्यापीठ विभाग) इत्यादिसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास येईल याची काळजी घेण्यात यावी.

सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी १८ ऑक्टोबर, २०१९ ते १८ नोव्हेंबर, २०१९ असा होता **तथापि सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची मुदत २० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत वाढविण्यात आली असून,**यापुढे कोणत्याही परिस्थितीत सदर मुदतीमध्ये वाढ करता येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ संकेत स्थळावरून सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक पुढीलप्रमाणे (www.unipune.ac.in > Home page BOD Online > For Colleges/university department/Teachers>Users Login & Main menu > Foundation day Award – Enter)

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाच्या पाच छापील प्रती आवश्यक कागदपत्रासह दिनांक २३ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेपर्यंत नियोजन व विकास विभागामध्ये सादर कराव्यात. विद्यापीठ वर्धापन दिन पुरस्कार मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ऑनलाईन अर्ज सादर करावेत. तसेच सदर प्रस्तावासोबत अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे पाच छायाचित्र व जर प्रस्ताव उत्कृष्ट महाविद्यालय व संस्थेसाठी असेल तर महाविद्यालयाच्या इमारतीचे (महाविद्यालयाचे नाव दिसेल असे) कार्ड आकाराचे पाच छायाचित्र सादर करावेत.

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाच्या छापील प्रती विहित मुदतीत सादर न केल्यास तसेच ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त सादर केलेल्या कोणत्याही अर्जाचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
नियोजन व विकास विभाग

सोबत : विद्यापीठ वर्धापनदिनाच्या मार्गदर्शक तत्वांची प्रत